## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ४२९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२०/०७/२०१६.

**१) शुल्लक कारणावरुन मारहान करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक १९/०७/२०१६ रोजी १३.०० वा. दरम्यान दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी बालकीसन चांदमलजी झंवर वय ६६ वर्ष, रा. मौलाना आझाद वार्ड भंडारा यांना दिवानी दाव्याची नोटीस दिल्याचे कारणावरुन त्यांच्या दुकाना समोरील सार्वजनीक रस्त्यावर येवुन फिर्यादीचा अपमान करण्याचे उद्देशाने अश्लिल शब्दात शिविगाळ केली. व फिर्यादीचा मुलगा हा वाचविण्यास गेला असता त्याच्यावर हात उचलुन हमला करीत जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,३५२,५०४,५०६,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पो.स्टे. भंडारा हे करीत आहे.

**२) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :—**

दिनांक १९/०७/०१६ रोजी १८.१० वा. दरम्यान आरोपीने आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६ पी ०६४३ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत कारधा टोल नाका येथे चालवितांना मिळुन आला. त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोंगाडे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) औषधी उपचारा दरम्यान मृत्यु. :—**

दिनांक १६/०७/०१६ रोजी २३.०० वा. दर यातील मृतक विवेक जगदीश पवनकर वय ०६ वर्ष, रा. सासरा याची प्रकृती दि. १६/०७/२०१६ ला बिघडल्याने त्यास औषधउपचारा करीता ०९.३५ वा. सा. रु. भंडारा येथे भरती केले. व उपचारा दरम्यान २३.०० वा. मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र पो.स्टे. साकोली येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. वानखेडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. रामटेके पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

20/7/16